औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. १/११/९९ रोजी झालेल्या ११०व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

---

बैठकीत खालीलपदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. अनिल पोलकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. श्री. रामराव शिनगारे | मुख्याधिकारी औ. मं. |
| ३. श्री. सिकंदर अली, कार्यकारी अभियंता मनपा औरंगाबाद. आयुक्त मनपाचे यांचे | सदस्य प्रतिनिधी. |
| ४. श्री. चव्हाण नगररचनाकार. उपसंचालकनगररचना औरंगाबाद विभाग | यांचे सदस्य प्रतिनिधी. |
| ५] श्री. अशोक वाहेती | सदस्य |
| ६] श्री. बाळाजी बच्चेवार | सदस्य |
| ७] श्री. राजेश लहानकर | सदस्य |
| ८] श्री. पुरुषोत्तम शर्मा | सदस्य |
| ९] श्री. मनोज श्रीवास्तव | सदस्य |
| १०] श्री. संजय नलावडे | सदस्य |
| ११] श्री. प्रदीप साळुंकी | सदस्य |
| १२] श्री. पी. के. देशमुख | सदस्य |
| १३] श्री. अभय चाटे | सदस्य |

वंदे मातरम या राष्ट्रगीताने बैठकीस सुरुवात करण्यांत आली.

बैठकीचे कामकाज सुरु होण्यापुर्वी मा. मुख्याधिकारी औ. मं. यांनी मा. सभापती/औ. मं. व इतर उपस्थित सन्माननीय सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तदनंतर पटलावर असलेल्या विषयानुसार बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली.

विषय क्र. २: दि. २१. ५. ९९ रोजी घेतलेल्या १०९व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

दि. २१. ५. ९९ रोजीच्या बैठकीत घेण्यांत आलेल्या निर्णय स्थायी करण्यासाठी, मंडळाचे विधी सहाय्यक तथा मि. द्य. श्री. गोसावी यांनी मंडळास वाचुन दाखविले. या कार्यवृत्तांतावर चर्चा करतांना मंडळाचे मा. सदस्य श्री. वाहेती यांनी मुद्दा उपस्थित केला की, २१. ५. ९९रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयावर कारवाई करण्यास बराच विलंब झालेला आहे तो बरोबर नाही. तसेच मंडळाच्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या[मयत श्री. चव्हाण] प्रकरणी मंडळाने सहानुभुतीने निर्णय घेतला. परंतु त्या प्रकरणी पैलेवर कारवाई केलेली नाही असे प्रतिपादन केले. मंडळाने घेतलेल्या निर्णयावर

त्वरीत कारवाईकरणे हे अधिकाऱ्याकडून अपेक्षीत आहे. मा. सभापती यांनी अशा सूचना केल्या की, यापुढे अशा प्रकारची दिरंगाई होणार नाही याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी.

मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. शर्मा यांनी अशी विचारणा केली की, वसमत येथील मंडळाचे जे जुने गाळे आहेत. त्यासंबंधीत, म्हणजे ते कोणाला दिलेले आहेत , कशा तत्वावर दिलेले आहे. इ बाबतची माहिती या बैठकीत सादर करावी असे आदेशमागील बैठकीत मा. सभापती यांनी दिले होते. त्याबाबत काय कारवाई झाली याचा खुलासा करावा असे मा. सदस्य श्री. शर्मा यांनी प्रतिपादन केले.

त्यावर श्री. गोसावी मि. व्य. यांनी माहिती दिली की, वसमत येथील जुने गाळे हे प्राचार्य शासकीय अध्यापक विद्यालय, वसमत यांनी भाडेतत्वावर वाटप केलेले आहेत व त्यांनाते एक रक्कमी पध्दतीवर करुन घ्यावेत म्हणून पत्राद्वारे मंडळाने कळविले आहे. तथापी त्यांचेकडून अद्याप काहीच उत्तर प्राप्त झालेले नाही. या अनुषंगाने मा. सदस्य श्री. शर्मा यांनी बैठकीत असे सांगितले की, शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग , यांनी प्राचार्य, शा. अ. विद्यालय वसमत जि. परभणी यांना"कार्यालयीन पत्र क्र. लेखा-४/९९-२०००/२६२४१ दि. ९. ७. ९९ अन्वये असे कळविले की, वसमत येथील मंडळाचे जे पाच गाळे भाडेतत्वार घेतलेले आहेत वस्तीगृह बंद करुन मेस[खानावळ]चे साहित्य सध्या कार्यरतअसलेल्या इमारतीत स्थलांतरीत केलेले आहे. सदर इमारत वापरात नसल्यामुळे रिकामी करुन रितसर गृहनिर्माण मंडळाच्या ताब्यात देण्याची कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहे" यास्तव मंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन सदर गाळे संबंधीतांकडून ताब्यात घेऊन त्याची जाहिरातीद्वारे विक्री करण्यासाठी पुढील कारवाई करावी असे मा. सदस्य श्री. शर्मा यांनी प्रतिपादन केले. याअनुषंगाने मा. सभापती, यांनी सांगितले की, याविषयी त्वरीत कारवाई होईल हे पहावे.——

दि. २१. ५. ९९ रोजीच्या कार्यवृत्तांतावर चर्चाकरण्यात आली. त्यानुसार मंडळाने खालील प्रमाणे एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्र. ६६६</u>

दिनांक २१. ५. ९९ रोजी झालेल्या मंडळाच्या १०८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन १०९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला व तसेच मंडळाने असा निर्णय घेतला की, वसमत येथील मंडळाने जे भाडे तत्वावर शिक्षण विभागास गाळे दिलेले आहेत ते रिकामे करुन घेऊन त्याची जाहिरातीद्वारे विक्री करण्याची तात्काळकार्यवाही करावी.

विषय क्र.२: औरंगाबाद मंडळा अंतर्गत प्रगतीपथावरील गृहनिर्माण योजनेचा आढावा.

या विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविली व मंडळाअंतर्गत सध्यास्थिती चालु असलेल्या गृहनिर्माण योजनांच्या बांधकामाबाबतच्या प्रगतीबाबत व सदर योजनांना पुरवावयाच्या बाह्यसुविधांच्या बाबतीत येणा-या अडचणीच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर माहितीविषद केली. कार्यकारी अभियंता श्री. देशपांडे यांनी मंडळास माहिती दिली की, मुकुंदवाडी, मुर्तिजापूर येथील नविन योजनांना विद्युतपुरवठा करण्यासाठी एमएसईबीने अंदाजे १.५६० कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. सदरची रक्कम मागण्याचे प्रयोजन विचारले असता विद्युत मंडळाकडून असे सांगण्यात आले की, सदर योजनांना विद्युत पुरवठा करण्यासाठी एक नविन ३३ के.व्ही सबस्टेशन उभारावे लागेल कारण सध्या अस्तित्वात असलेल्या विद्युत लाईनवरुन विद्युतपुरवठा करणे त्यांना शक्य नाही. त्यासाठी अंदाजे १.५६० कोटी रक्कमेची मागणी विद्युत मंडळाने केली आहे. तसेच पाणीपुरवठयाच्या सुविधांसाठी मनपाने र. ७१.०० लाख रुपयाची मागणी केलेली आहे असेही कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. कारण या मागणीच्या संदर्भात मनपातर्फे असे सांगण्यात आले की, सदर योजनेच्या पाणीपुरवठयासाठी एन-५ सिडको येथुन नविन पाणीपुरवठा वाहिनी मनपाला टाकावी लागेल व त्यासाठी वरील रु.७१.०० लाख रुपयाची मागणी मनपाने केलेली आहे. कार्यकारी अभियंता श्री. देशपांडे यांनी मंडळास माहिती दिली की, पाणीपुरवठा व विद्युत पुरवठयाच्या सुविधांसाठी संबंधीत विभागाकडुन उपरोक्त रक्कमांची मागणी करण्यात आली आहे व त्याप्रमाणे ही रक्कम मनपा व विद्युत मंडळाकडे भरल्यास सदर योजनांतील गाळ्यांची किंमत वाढेल. तथापी, सदर जादा रक्कम भरण्याची वेळ येऊ नये म्हणून प्राधिकरणस्तरावरुन शासनाकडे पाठपुरावा करावा यासाठी मंडळाने पत्रव्यवहार केलेला आहे. या अनुषंगाने मा. सभापती यांनी सांगितले की, मंडळाने जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या गाळ्यांच्या किंमतीपेक्षा आता वरील कारणामुळे किंमत वाढल्यास त्याचा लाभधारकावर भुर्दंड पडेल व त्याच्यामध्ये असंतोष निर्माण होऊन मंडळापुढे समस्या निर्माण होईल. यापुढे मा. सभापती यांनी मंडळास माहिती दिली की, वरील समस्येचे निवारण करण्यासाठी संबंधीत विभागाच्या [मनपा व विद्युत मंडळ] अधिका-यासह शासनस्तरावर मा. मंत्रीमहोदयाच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केल्यास या प्रकरणी मार्ग निघु शकेल. मा. मुख्याधिकारी औ.मं. यांनी मंडळास माहिती दिली की, प्रस्तुत प्रकरण हे मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निदर्शनास मंडळाने आणुन दिले आहे व या योजना राष्ट्रीय गृहनिर्माण योजना अंतर्गत राबविण्यात येत आहेत यासाठी संबंधीत विभागाने बाह्यसुविधा

पुरविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या दृष्टीने उच्च स्तरीय पातळीवर ही बाब हाताळण्यात येत आहे. मंडळाचे सदस्य मा. श्री. बाहेती व इतर सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, या योजना राष्ट्रीय गृहनिर्माण योजने अंतर्गत राबविण्यात येत आहेत. त्यामुळे सदर योजनांच्या विद्युत पुरवठ्याचा खर्च हा शासनाच्या ऊर्जा विभागाने सोसावा व याबाबत शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती म्हाडामार्फत शासनास करावी असे मा. सभापती यांनी सांगितले. तसेच तिसगांव येथील गृहनिर्माण योजनेच्या बाबतीतही पाणी पुरवठा व विद्युत पुरवठ्याच्या अडचणीबाबत संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे असे कार्यकारी अभियंता यांनी मंडळास सांगितले. शेवटी सभापती यांनी सांगितले की, सदर योजनांच्या गाळ्यांची किंमत ही लोकांना परवडेल अशी राहील याबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी व गाळ्यांची किंमत कमी करण्यासाठीही प्रयत्न करावे असेही मा. सभापतीयांनी सांगितले.

या विषयावर वरील प्रमाणे सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६६७</u>

मंडळाअंतर्गत प्रगतीपथावरील गृहनिर्माण योजनाबाबत सविस्तरपणे मंडळाने नोंद घेतली. सध्या कार्यान्वीत असलेल्या योजनांना बाह्यसुविधा पुरविण्यासाठी संबंधीत विभागाकडून अवाजवी प्रमाणात मागण्यात येणाऱ्या खर्चाच्या रकमा कमी करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यासाठी प्राधिकरणाला कळवावे जेणे करुन गाळ्यांच्या किंमती ह्या किफायतशीर राहतील.

विषय क्र. ३ <u>मंडळाच्या प्रस्तावीत योजना विषयी माहिती.</u>

या विषयावर कार्यकारी अभियंता यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली व मंडळाच्या प्रस्तावीत योजनेबाबत मंडळास माहिती विषद केली. मंडळाने सदर विषयाच्या माहितीबद्दल नोंद घेतली व निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६६८</u>

मंडळाने प्रस्तावीत केलेल्या गृहनिर्माण योजनांच्या माहितीची नोंद घेतली.

कार्यालयात जाऊन या विषयी सर्व चौकशी करून माहिती द्यावी
वडिपी प्लॅनच्या नकाशासह तसा अहवाल मि. व्य. यांनी सादर करावा
प्रस्तुत प्रकरणी मि. व्य. यांनी अहवाल सादर केल्यानंतर मा. सभापती
व मु. अ. /औ. मं. यांनी सदर निविदाबाबतचे प्रकरण लवकर
निकाली काढावे असे मा. सर्व सदस्यांनी सांगितले.

बैठकीच्या शेवटी मंडळाअंतर्गत झो. गृ. कार्यक्रमा अंतर्गत मराठवाड्यात ९९-२० ०० या आर्थिक वर्षामध्ये कोण-कोणत्या शहरासाठी असलेली तरतुद व आतापर्यंत त्यावर झालेल्या खर्चाबाबतची माहिती सन्माननीय सर्व सदस्यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती करून घेतली.

या सर्व चर्चेअंती सन्माननीय सदस्यांनी केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने मंडळाने खालील प्रमाणे ठराव पारीत केला की.

<u>ठराव क्र. ६६९</u>

अ] परळी वैजनाथ, नगरपरिषदेने परळी येथे त्यांचे मालकीची १० हे. जमिन मंडळास गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी विनामुल्य दिल्यामुळे न. प. चे अभिनंदन करण्यांत येत आहे व तसे त्यांना पत्राने कळवावे.

मराठवाड्यातील सर्व नगरपरिषदांना गृहनिर्माण मंडळास त्यांचे मालकीची असलेली जमिन गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी विनामुल्य देऊन परळी नगरपरिषदेचे अनुकरण करण्याविषयी विनंती करावी.

ब] बिलोली, नायगांव, नर्सी [जि. नांदेड] सावेगांव, सिल्लोड, परतुर, बदनापुर, जाफ्राबाद, फुलंब्री, मंठा, लासुर इ. ठिकाणी व नविन निर्मित तालुक्याच्या ठिकाणी गृहनिर्माण योजना राबविण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.

मा. मु. अ. औ. मं. यांनी उपस्थितांचे आभार मानले व राष्ट्रगीतानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

Chairman
A'bad Housing & Area Dev. B
Aurangabad.

[अनिल पोलकर]
सभापती/औरंगाबाद मंडळ.

Through Ex. E
P.M.

Ex. E. P.M. to verify.